या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

पाटोदा PATODA SANCHAR
# संचार

E-mail-pat.sanchar@gmail.com संस्थापक संपादक- स्व.विश्वकर्मा डोळसे संपादक-विलास डोळसे




❑ पाटोदा/बीड ❑ स्थापना वर्ष ३५ वे, वर्ष २० वे ❑ अंक १३५ वा ❑ शुक्रवार दि. ०४ जुलै २०२५ ❑ पाने-४ किंमत १ रुपया ❑ पो.र.नं.एल/एसबी/बीड/रनंप-२२१/२०२५-२७ ❑ R.N.I. No.MAHMAR/46359

❑ PATODA/BEED ❑ YEAR 20 th ❑ Issu -135 ❑ Friday 04 July 2025 ❑ Page- 4 Price- Rs.1. ❑ Post.Reg.No.L/SB/Beed/RNP-221/ 2025-27 ❑ R.N.I. No.MAHMAR/46359

# आमदाराच्या नावाने कॉल, बनावट सही; कोट्यवधींचा निधी बीड जिल्ह्यात वर्ग, संशयित आरोपींमध्ये सरपंचाचा समावेश

**मुंबई । प्रतिनिधी**

**आमदाराचं बनावट लेटरहेड आणि सही वापरून ३ कोटींपेक्षा जास्त निधी बीड जिल्ह्यात वर्ग केल्याचा प्रकार समोर आलाय. अधिकाऱ्यांनी हा प्रकार उघडकीस आणला आहे. या प्रकारामुळे आमदारांचा निधी योग्य ठिकाणीच जातोय का हे पाहण्यासाठी तपास यंत्रणा सरकारनं उभा करावी अशी मागणी भाजप आमदार प्रसाद लाड यांनी विधानपरिषदेत केली. याआधी इतर काही आमदारांनाही असा अनुभव आला असल्याचंही ते म्हणाले.**

अधिवेशन संपल्यानंतर ४.३० वाजता मला रत्नागिरी येथून अधिकाऱ्यांचा फोन आला. आपण मागणी केल्याप्रमाणे ३ कोटी २० लाख निधी बीड जिल्ह्याला वर्ग केला आहे. त्याबाबत तुमचा फोनही आला होता असं सांगण्यात आले. त्यानंतर मला संशय आला आणि ती पत्राची प्रत मागवली. त्यातले लेटरहेड बनावट होते. सही खोटी होती. मी फोनही केला नव्हता असा गंभीर आरोप आमदार प्रसाद लाड यांनी केला.

प्रसाद लाड म्हणाले की, मी चौकशी केली असता हा निधी कुणीतरी चोरायचा प्रयत्न केला आहे हे लक्षात आले. त्यानंतर मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कानावर ही बाब घातली. मुंबई पोलीस आयुक्तांशी बोललो. रात्री उशिरा याबाबत सायन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यात ४ नावे माझ्याकडे आली तीदेखील पोलिसांना कळवली आहेत. याप्रकारे सरकारी निधी हडपण्याचा प्रकार समोर आला. हा निधी मोठा होता म्हणून लक्षात आले. परंतु छोटे छोटे निधी हडप करण्याचे प्रकार याआधीही झालेत असं त्यांनी सांगितले.

तसेच आमदार उमा खापरे, श्रीकांत भारतीय यांच्याबाबत हे झाले होते. स्वत: राम शिंदे सभापती होण्यापूर्वी त्यांच्यासोबतही हे घडले होते. अशा



## बीड जिल्ह्याचं नाव आल्यानं मी सावध झालो

प्रसाद लाड म्हणाले की, माझ्या नावाचा गैरवापर करून निधी चोरण्याच्या प्रकाराची तक्रार पोलिसात दिलीय. तसंच पोलीस आयुक्त आणि मुख्यमंत्र्यांनाही माहिती देण्यात आलीय. या प्रकरणाच चौघांची नावे समोर आली आहेत. त्यातल्या एकाचं नाव बंडू असून तो सरपंच आहे. यात बीड जिल्ह्याचं नाव आल्यानं मी सावध झालो. आधीच बीडचा बोलबाला झाला आहे. बीडमधले हे महाठग कोण आहेत त्याची पोलीस चौकशी करत आहेत.

टोळ्या राज्यात कार्यरत आहेत. बीड जिल्ह्याचे नाव आल्यावर मी सतर्क झालो. आधीच बीडचा बोलबाला झाला आहे. बीडमधले हे महाठग कोण आहेत त्याची पोलीस चौकशी करत आहेत. माझ्याकडे अज्ञात नंबर आलेत ते पोलिसांना दिलेत. बंडू नावाचा गृहस्थ आहे जे सरपंच असल्याचे सांगतात. पोलीस चौकशी करतील. तांत्रिक पद्धतीने आमदार निधी वाटप केले जावे, जेणेकरून आमदारांना त्याचा ओटीपी येईल मग निधी दिला जाईल अशी मागणी मी सभागृहात केल्याचे आमदार प्रसाद लाड म्हणाले. दरम्यान, या प्रकरणाची गंभीर दखल घेत सभापतींनी चौकशी करून तात्काळ दोषींना अटक करण्याचे निर्देश दिले आहेत.

बनावट लेटरहेड, बनावट सही आणि हुबेहुब आवाज काढून ३ कोटी २० लाखांचा निधी बीड जिल्ह्यात वर्ग करण्याची मागणी केली होती. प्रसाद लाड यांच्या आवाजात हा कॉल करण्यात आला होता. एआयच्या मदतीनं केलेल्या या कॉलबाबत अधिकाऱ्यांना संशय आल्यानं हा प्रकार समोर आला. दरम्यान, लाड यांच्या पीएने एका संशयिताला फोन केला असता त्यानं उडवाउडवीची उत्तरं दिली.


# आषाढी एकादशीला भाविकांची कसलीही गैरसोय होऊ नये-आ.संदीप क्षीरसागर

### पोलीस, आरोग्य, एस.टी., महावितरण विभागाला दिल्या सूचना

**बीड । प्रतिनिधी**

आषाढी एकादशी या महाराष्ट्रातील वारकरी सांप्रदायाच्या सर्वात मोठ्या महोत्सवाच्या वेळी भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी प्रशासनाने उपाययोजना कराव्यात आणि काळजी घ्यावी. अशा सूचना आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

रविवारी (दि.६ जुलै २०२५) रोजी आषाढी एकादशी आहे. एकादशीच्या निमित्त, बीड तालुक्यात असलेल्या धाकटी पंढरी श्री क्षेत्र नारायणगड येथे संपूर्ण बीड जिल्ह्यातून भाविक येतात. तसेच बीड जिल्ह्यातून अनेक भाविक पंढरपुरला जातात. या अनुषंगाने भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रशासनाला सूचना केल्या आहेत. श्री क्षेत्र नारायणगड येथे जिल्ह्याच्या प्रत्येक भागातून भाविक येतात. त्यांच्यासाठी सर्व आगारांतून श्री क्षेत्र नारायणगडावर जाणे-येणेसाठी दिवसभर विशेष बसेसची व्यवस्था करावी आणि श्री क्षेत्र पंढरपूरला जाण्यासाठी बीड आगारातून जादा बसेस सोडण्यात याव्यात अशा सूचना आ.क्षीरसागर



पान दोन वर

# ई-पीक पाहणीस ६ जुलैपर्यंत मुदतवाढ; पीक दुरूस्तीसाठी २१ जुलैपर्यंतची मुदत

**बीड । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांना ई-पीक पाहणी करण्यात येत असलेल्या अडचणीच्या पार्श्वभूमीवर उन्हाळी हंगाम २०२४-२५ करीता सहायक स्तरावरील ई-पीक पाहणीसाठी ०६ जुलैपर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आली आहे, असे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी कळवले आहे.

ई-पीक पाहणीची प्रक्रिया वेळेत, अचूकपणे पूर्ण होणे आवश्यक आहे. त्यामुळे सर्व महसूल, कृषी अधिकाऱ्यांना योग्य त्या सूचनाही केल्या आहेत. मंडळ अधिकारी यांना मोबाईल ॲपद्वारे पीक दुरूस्तीसाठी २१ जुलैपर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आलेली आहे, असेही त्यांनी कळवले आहे.

# आता वाळू वाहतूक होणार २४ तास; महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची घोषणा

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात वाळू वाहतुकीसंदर्भातील दीर्घकाळ प्रलंबित असलेला निर्णय अखेर घेण्यात आला असून, सकाळी ६ ते सायंकाळी ६ या कालावधीत उत्खनन केलेल्या वाळूची वाहतूक आता २४ तास करता येणार आहे, अशी घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत केली.

बावनकुळे म्हणाले, सद्यस्थितीत सकाळी ६ ते सायंकाळी ६ या वेळेतच वाळूचे उत्खनन परवानगीने होते. पण दिवसभरात



साठवलेली वाळू रात्री उचलता न आल्यामुळे वाहतूक क्षमतेचा योग्य उपयोग होत नाही आणि त्यामुळे अवैध वाहतूक वाढते. ही परिस्थिती बदलण्यासाठी महाखनीज पोर्टलवरून २४ तास ईटीपी तयार करता येईल अशी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

राज्यात नैसर्गिक वाळूची मर्यादा लक्षात घेऊन, शासनाने कृत्रिम वाळू धोरण राबविण्याचा निर्णय घेतला आहे. प्रत्येक जिल्ह्यात ५० क्रशर युनिट्स उभारण्यात येणार असून त्यासाठी ५ एकर जमीन दिली जाणार आहे. तीन महिन्यांत १००० क्रशर युनिट्स सुरू करण्याचे उद्दिष्ट आहे. घरकुल योजनेअंतर्गत प्रत्येक लाभार्थ्याला ५ ब्रास वाळू मोफत दिली जाणार आहे.

एनजीटीच्या अटीमुळे १०

# देवळालीत महिलेला मारहाण करून घरफोडी; ३० हजारांची रोकड लंपास

आष्टी । प्रतिनिधी

बुधवारी दुपारच्या दरम्यान घरासमोरील शेतात काम करत असताना येथील एकाच कुटुंबातील चौघांनी येऊन जुन्या भांडणांची कुरापत काढून लाथाबुक्यांनी मारहाण करत, शिवीगाळ करून, जिवे मारण्याची धमकी दिली व बंद घराचा कडी, कोंडा तोडून आत घुसून संसारपयोगी वस्तुची नासधूस करत घर खर्चासाठी ठेवलेले रोख ३० हजार रूपये घेऊन गेल्याची घटना २ जुलै रोजी दुपारच्या दरम्यान घडली. या प्रकरणी अंभोरा पोलिस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आष्टी तालुक्यातील देवळाली (पानाची) येथील कल्पना मुकुंद वेदपाठक या दुपारच्या दरम्यान स्वत:च्या घरासमोरील शेतात काम करत असताना येथील चौघांनी त्याच्या घरी घेऊन जुन्या भांडणाची कुरापत काढून लाथा, बुक्यांनी मारहाण करत, कुटुंबाला शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी देत घराचा कडी, कोंडा तोडून साहित्यांची नासधूस करत घर खर्चासाठी ठेवलेला ३० हजार रूपये घेऊन गेल्याची घटना देवळाली येथे घडली.

याप्रकरणी अंभोरा पोलिस ठाण्यात कल्पना मुकुंद वेदपाठक याच्या फिर्यादीवरून संजय शंकर कटके, मंगल संजय कटके, विठ्ठल शंकर कटके, ओंकारेश्वर चांगदेव कटके यांच्यावर अंभोरा पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (बी.एन.एस) ३०५(अ), ११५(२), ३५२, ३५१(२), ३२४(२), ३(५) नुसार चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# जिल्ह्यात पान टपरी पेक्षा अनाधिकृत इंग्लिश स्कूल जास्त

## बीडमध्ये अनाधिकृत शाळांवर कारवाई होणार का?-मनोज जाधव

### शाळा तपासून अनाधिकृत शाळांची माहिती शिक्षण विभागाने मागवली

**बीड । प्रतिनिधी**

राज्यातील अनाधिकृत शाळांबाबतची माहिती सादर करण्याबाबत शिक्षण संचालनालयाने आदेश निर्गमित केले असून आता जिल्ह्यात अनाधिकृत शाळा आढळुन आल्यास सदरिल शाळेवर शासन निर्णय दि.१८ डिसेंबर २०२३ नुसार कार्यवाही करण्याबाबत सूचित केलेले आहे. अनाधिकृत शाळांची माहिती शिक्षण विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख यांचेकडुन त्यांचे बीट/केंद्र मधील शाळांना प्रत्यक्ष भेट देऊन त्यांचे जियो टॅग फोटो काढणे आणि विहित प्रपत्रात माहिती भरुन तात्काळ ०७ जुलै पर्यंत सदरिल माहिती व अहवाल सादर करण्याचे आदेश शिक्षण विभागाने दिले आहेत. मात्र जिल्ह्यात पान टपरी पेक्षा अनाधिकृत इंग्लिश स्कूल आणि इतर शाळा जास्त आहेत. तेव्हा शिक्षण विभागाला अनाधिकृत शाळा सापडणार का? आणि त्यांच्यावर कारवाई होणार का ? असा सवाल शिवसंग्रामचे युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी केला आहे.

राज्यात मागील काही वर्षांमध्ये राज्य शासनाची कोणतीही मान्यता न घेता अनाधिकृत शाळा मोठ्या प्रमाणात सुरू झाल्या आहेत. या शाळा विद्यार्थ्यांकडून भरमसाट शुल्क वसूल करत असतात. या शाळांवर कारवाई करण्यासाठी शिक्षण संचालनालय यांनी राज्यातील सर्व जिल्ह्यात तपासण्या करण्याचे आदेश दिले आहेत. बीड जिल्ह्यात देखील बऱ्याच अनाधिकृत शाळा असल्याची भीती व्यक्त होत आहे. परंतु जिल्ह्यातील अनाधिकृत शाळांची तपासणी करून त्यावर कारवाई केली जाईल का ? असा प्रश्न विचारला जात आहे. त्यामुळे आता अधिकाऱ्यांनी शाळा तपासणी करण्याचे कागदी घोडे न नाचवता संबंधित शाळांवर कारवाईच करावी. अशीही मागणी मनोज जाधव यांनी केली आहे.

# पालकमंत्री अजित पवारांच्या पुढाकाराने 'सीट्रिपलआयटी' चा मार्ग खुला; जागा-निधी देण्याचा निर्णय

## दरवर्षी सुमारे ७ हजार युवकांना उद्योगांच्या गरजेनुसार आवश्यक जागतिक दर्जाचे औद्योगिक, तांत्रिक प्रशिक्षण दिले जाणार

**मुंबई । प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पुढाकाराने बीड येथे 'टाटा टेक्नॉलॉजी'च्या माध्यमातून सुरु करण्यात येणाऱ्या 'सेंटर फॉर इन्व्हेंशन, इनोव्हेशन, इक्युबेशन ॲन्ड ट्रेनिंग' अर्थात 'सीट्रिपलआयटी'साठी बीड एमआयडीसी औद्योगिक क्षेत्राच्या सुविधा क्रमांक -३ मधील चार हजार चौरस मीटर जागा तसेच केंद्र उभारणीसाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याचा निर्णय 'एमआयडीसी'च्या संचालक मंडळाने घेतला आहे.

या निर्णयामुळे बीड जिह्यातील युवकांना औद्योगिक प्रशिक्षण, तांत्रिक कौशल्यविकासाच्या माध्यमातून उद्योगक्षम बनविणे, रोजगार, स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करुन होण्याचा मार्ग खुला झाला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संबंधित अधिकाऱ्यांच्या सातत्यपूर्ण बैठका घेऊन 'सीट्रिपलआयटी'च्या उभारणीची प्रक्रिया वेगाने पूर्ण केली आहे. 'एमआयडीसी'च्या या महत्वपूर्ण निर्णयामुळे केंद्रासंदर्भातील त्रिपक्षीय करार आणि प्रकल्पाचे भूमिपूजन लवकरच होईल अशी अपेक्षा आहे.

बीड जिल्ह्यातील विद्यार्थी, युवकांना औद्योगिक प्रशिक्षण, तांत्रिक कौशल्यविकासाच्या माध्यमातून उद्योगक्षम बनविण्यासह रोजगार, स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी 'सेंटर फॉर इन्व्हेंशन, इनोव्हेशन, इक्युबेशन ॲन्ड ट्रेनिंग' अर्थात (सीआयआयआयटी) स्थापन करण्याची घोषणा उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित पवार



यांनी या वर्षाच्या सुरुवातीला घेतला होता. त्यासाठी 'टाटा टेक्नॉलॉजी' कंपनी बीड जिल्ह्यासाठी १९१ कोटी रुपये खर्चून नवीन 'सीआयआयआयटी' स्थापन करणार आहे. कंपनीने तशा आशयाचे पत्र उपमुख्यमंत्री अजित पवार यांना पाठविले आहे. या नव्या सेंटरमधून दरवर्षी ७ हजार युवकांना प्रशिक्षित केले जाणार आहे. यामुळे बीड जिल्ह्यात उद्योगपुरक वातावरण निर्माण होण्यास मदत होणार आहे.

पालकमंत्री म्हणून अजित पवार यांनी २ एप्रिल २०२५ रोजी केलेल्या बीड जिल्ह्याचा दौऱ्यात बीड जिल्ह्यातील युवकांसाठी उद्योग क्षेत्राच्या मदतीने 'सेंटर फॉर इन्व्हेंशन, इनोव्हेशन, इक्युबेशन ॲन्ड ट्रेनिंग' (सीआयआयआयटी) स्थापन करण्याची घोषणा केली होती. त्याअनुषंगाने त्यांनी 'टाटा टेक्नॉलॉजी' कंपनीला पत्र लिहून सहकार्य करण्याचे आवाहन केले होते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्राला 'टाटा टेक्नॉलॉजी' कंपनीने सकारात्मक प्रतिसाद दिला आणि बीड जिल्ह्यासाठी १९१ कोटी रुपये खर्चून नवीन 'सीआयआयआयटी' स्थापन करण्याची तयारी दर्शविली. १९१ कोटींपैकी १५ टक्के म्हणजे ३३ कोटी रुपयांचा खर्च बीड जिल्हा प्रशासन करणार असून उर्वरीत खर्च 'टाटा टेक्नॉलॉजी' आणि त्यांच्या भागीदार कंपन्या, संस्था उचलणार आहेत. 'टाटा टेक्नॉलॉजी' कंपनीने 'सीआयआयआयटी' स्थापन केल्यानंतर दरवर्षी सुमारे ७ हजार युवकांना उद्योगांच्या (४.०)

पान दोन वर

संचार

## एसटीची श्वेतपत्रिका

एसटी महामंडळाची आर्थिक सद्यस्थिती दर्शवणारी एक श्वेतपत्रिका जाहीर झाली. एसटीचे एकूण महसुली उत्पन्न, खर्च, कर्ज आणि देयके किती आहेत? याबाबतचा आढावा घेणारी ती श्वेतपत्रिका होती. या श्वेतपत्रिकेत ४५ वर्षांचे अवलोकन करण्यात आले आहे. या ४५ वर्षांपैकी फक्त ८ वर्षेच महामंडळाला काही प्रमाणात नफा झाल्याचे दिसून आले आहे. उर्वरित सर्व वर्षात मोठ्या प्रमाणात तोटा झाल्याचे समोर आले आहे, त्यामुळे हा तोटा का झाला? यावर उपाययोजना काय आहे, याबाबत श्वेतपत्रिकेत नमूद केले आहे. एसटी महामंडळाने पुढील वाटचालीसाठी काही महत्त्वपूर्ण उपाययोजना सुचविलेल्या आहेत. अपघात कमी करण्यासाठी विविध उपाययोजना राबवण्यात येणार आहेत. प्रवासी व मालमत्तांच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही प्रणाली बसवली जाणार आहे. सध्या सवलत नसलेल्या लांब पल्ल्याच्या प्रवाशांसाठी भाड्यात सवलत देण्याचा विचार आहे. तसेच कर्मचाऱ्यांसाठी कल्याणकारी योजना राबवण्याची योजना देखील आहे. त्याचप्रमाणे, एसटी महामंडळाच्या ताफ्यात दरवर्षी ५ हजार नवीन बसेसचा समावेश करणे, एसटी ताफ्यात भाडेतत्त्वावरील हायटेक व्होल्वो बसेसचा समावेश करणे, एसटी महामंडळाच्या जागांवर इंधन पुरवठादार कंपन्याकडून महसुली भागीदारी तत्त्वावर खासगी वाहनांसाठी किरकोळ इंधन विक्री केंद्र सुरू करणे, एसटी महामंडळाच्या जागांचा बिओटी/पीपीपी तत्त्वावर विकास करणे, प्रवासी सोयी आणि सुविधा निर्माण करणे, उत्पन्न वाढीसाठी लक्षांक निश्चित करणे, आदी उपाययोजनांचा समावेश आहे.

त्याचप्रमाणे, एसटी महामंडळाने तोट्याची पाच महत्त्वाची कारणे या श्वेतपत्रिकेत सांगितली आहेत. त्यात, राज्य परिवहन महामंडळाकडे बसेसची कमतरता असल्याचा मुद्दा नमूद केला आहे. उपलब्ध असलेल्या बसेसचे आयुर्मान अधिक असणे आवश्यक आहे. अनिवार्य व तोट्यातील चलन, अनियमित भाडेवाढ, अवैध वाहतूक ही एसटी तोट्यात जाण्यास कारणीभूत ठरली आहे. श्वेतपत्रिकेनुसार, महसूल वाढीच्या काही उपाययोजनांचा उल्लेख करण्यात आला आहे. त्यामध्ये उच्च दर्जाच्या व्होल्वो बस भाडेतत्त्वावर घेतल्या जाणार आहेत. महामंडळाच्या मालकीच्या जागांवर खासगी वाहनांसाठी इंधन पंप उभारण्यात येणार असून, त्यासाठी इंधन पुरवठादारांशी महसूल वाटप करार केले जाणार आहेत. तसेच, महामंडळाच्या मालमत्ता बीओटी किंवा पीपीपी मॉडेलवर विकसित केल्या जाणार आहेत. सी-कॅटेगरी मार्गांचे बी-कॅटेगरीत व बी-कॅटेगरीचे ए-कॅटेगरीत रूपांतर करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. प्रवासी सुविधांचा दर्जा उंचावणे आणि महसूल वाढीसाठी ठोस उद्दिष्टे निश्चित केली जाणार आहेत.

एसटी महामंडळाकडे पूर्वी कामगार वर्ग मोठा होता. मात्र आता कामगार वर्ग ७९ हजार आहे. आधी १८ हजार ५०० गाड्या होत्या. पण नंतर काही बसगाड्या मोडकळीस आल्या. गळक्या आणि तुटक्या बसेस रस्त्यावर चालत होत्या. गेल्या १० ते १२ वर्षांत हा ग्राफ कमी होत गेला आहे. नवीन बसेस घेतल्या नाहीत. ३ ते ४ वर्षांपूर्वी जर नवीन बसेस घेतल्या असत्या तर तोटा जास्त झाला नसता, याची कबुली परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे. महामंडळाचा तोटा सुमारे १० हजारांपेक्षा अधिक आहे. तो भरून काढणे कठीण आहे. त्याचे कारण २५ ते ३० हजार बसेस आहेत, त्याच्या जीवावर तोटा भरून काढणार का? हा प्रश्न आहे. ७७ वर्षांचा एसटी महामंडळाचा इतिहास आहे. गेल्या १० ते १५ वर्षांत हळूहळू ग्राफ कमी होत गेल्याचे दिसत आहे. त्यासाठी दर वर्षाला ५ हजार बसेस ताफ्यात आवश्यक आहेत. जेणेकरून एसटी महामंडळ नफ्यात राहील. पुढच्या ३ ते ४ वर्षांत एसटी तोट्यात राहणार नाही, असा विश्वास श्वेतपत्रिकेतून व्यक्त करण्यात आला आहे, ही समाधानाची बाब आहे. मात्र, एसटी महामंडळाला फायद्यात आणताना, मोक्याच्या ठिकाणी असलेले एसटी डेपो हे महामंडळाच्या ताब्यात असावेत. ते खासगी कंपन्यांच्या ताब्यात जाऊ नयेत, ही प्रवाशांची भावना आहे.

# ऐसे आर्त ज्याचे मनी । त्याची चक्रपाणी वाट पाहे।।

वारकरी संप्रदायाने श्री विठ्ठल हे आपले आराध्य दैवत आणि त्याची निष्काम भक्ती ही स्वतंत्र जीवननिष्ठा मानली,महाराष्ट्रधर्माचे जे प्रणेते संत सत्पुरुष मानले जातात,त्यापैकी श्रीसंत ज्ञानेश्वर-नामदेव-एकनाथ-तुकाराम हे प्रमुख वारकरी संतचतुष्टय.श्रीविठ्ठलोपासक वारकरी संतपुरुष आणि स्त्रियांनी रचलेले अभंगकाव्य हे या संप्रदायाला शेकडो वर्षांपासून प्रतिकुलतेत सतत उभारी देत राहिले.वर्षानुवर्षांच्या पंढरीच्या सामूहिक वारीची साधना त्यांची एक महाशक्ती ठरली.आजही लाखोंच्या संख्येने पांडुरंगाच्या भेटीसाठी निरपेक्ष यात्रा करणारा,काही सुनिश्चित सदाचार नियमितपणे करीत राहून अवघ्या विश्वाला एक आदर्श वस्तुपाठ देणारा,तळागाळापर्यंत पोहोचू शकलेला दुसरा संप्रदाय जगात दाखविता येणार नाही.एक वैशिष्ट्यपूर्ण आणि कदाचित सर्वाधिक लोकस्वीकृत असलेल्या या संप्रदायात त्याची निरंतरता आणि पुरातनता,संघटन आणि सुलभ आचारधर्म, काळावर मात करण्याची क्षमता लक्षणीय आहे.

*आले आले हे हरिचे डिंगर।वीर वारीकर पंढरीचे ।।*

*ध्वजा कुंचे गरुडटके।वैष्णव चालले नेटके ।।*

आले वैष्णवांचे दळ।भेणे पळे कलिकाळ ।।

असे संत नामदेव महाराज वर्णन करतात.पंढरीचे वारीकर-वारकरी म्हणजे वैष्णवांचे दळ आहे,आणि त्याच्यामुळे साक्षात कलिकाळ हा भिऊन पळून जातो.अशी विश्वासकता वारीमधील वारकऱ्यांविषयी संत नामदेवांनी एका अभंगात वर्णिली आहे.गेल्या साडेसातशे वर्षांच्या वारकरी सांप्रदायिक वाटचालीवर एक साधा दृष्टिकोन टाकला तरी त्याची अनेक वैशिष्ट्ये त्या त्या वेळचे चढ उतार आपल्या ध्यानी येतात.पंढरपूरची वारी म्हणजे मराठी संस्कृतीचे एक विलोभनीय स्वरूप आहे.लोकमानसाचे आणि लोकप्रवाहाचे सांस्कृतिक मानस वारीतून दरवर्षी प्रकट होते.वारकऱ्यांचा हा देव 'लोकदेव'आहे.तो त्यांच्यातच राहतो, त्यांच्यासारखाच वावरतो.माळकरी त्याला उराउरी केव्हाही पूर्व अट वा पूर्व व्यवस्था न करता भेटू शकतो.सगळा वावर अगदी मनमोकळा. टाळ,मृदंग,चिपळयांच्या नादघोषातून उचंबळत्या,लक्ष लक्ष भक्तीभावपूर्ण हृदयातून 'अमृताहूनी गोड' विठ्ठल नामाचा गजर करीत महाराष्ट्रातूनच नव्हे तर जिथे जिथे मराठी माणूस आहे,त्या भारतवर्षाच्या सर्वदूर कानाकोपऱ्यातून सुशिक्षित-अशिक्षित,श्रीमंत-गरीब,स्त्री-शूद्रादी आबाल-वृद्ध जीवीच्या आवडीने पायी अनवाणी

*न लगे मुक्ती धन संपदा ।संतसंग देई सदा ।।*

या ओढीने आणि आवडीने पंढरीच्या वारीसाठी धावत जातात.

ज्ञानदेव-नामदेवांच्या पूर्वकाळापासून एक विठ्ठलोपासक लोकसंप्रदाय म्हणून वारकऱ्यांचा इतिहास सांगता येतो.अगदी यादवकाळातील एक बहुजनमान्य लोकसंप्रदाय म्हणून या पंथाला आठ शतकापूर्वीच राजमान्यता मिळालेली होती.योगिराज ज्ञानदेव आणि भक्तराज नामदेव यांच्या योगभक्तीने भक्त-भागवतांची ही उपासना पुढच्या काळात अधिक बलवान बनली.वारकरी पंथियांनी सातत्याने मायमराठीची सेवा केली. 'मराठीपण' टिकविले. पांडित्यप्रदर्शनाचे प्रस्थ वाढू दिले नाही. लोकभाषा,लोकछंद,लोकमाध्यमे आणि लोकसमाज यांची जवळीक सतत वाढती ठेवली.वारकरी संप्रदायाच्या अशा कितीतरी बलस्थानांबद्दल असेच आणखी पुष्कळ लिहिता येण्यासारखे आहे.आज वारकरी हीच एक तळागाळापर्यंत पोहोचलेली इतिहासदत्त सामाजिक, सांस्कृतिक आचार-विचार धारा आहे.भक्ती ही जर समाजपरिवर्तनासाठी उपयोगी शक्ति ठरायची असेल तर वारकरी संप्रदायाकडे अपेक्षेने पाहिले जाते. या पंथाची प्रकृती सौम्य व समन्वयवादी.पण त्यात विद्रोहाची सुप्त शक्तीही असल्याने आत्मज्ञाबरोबर आत्मभान घडविणारा एक लोकमान्य संप्रदाय म्हणून आजच्या सैरभैर काळात त्याच्याकडून समंजसपणाची विशेष अपेक्षा करणे अनपेक्षित का ठरू नये.

या संप्रदायाने संपूर्ण महाराष्ट्रातून अनेक दिंड्यांतून लाखोंचा समुदाय एकत्र आणला,एकांतिक भक्तीचा पुरस्कार न करता सामुदायिक भक्तीला प्रोत्साहन दिले.त्यातूनच वारीची संकल्पना निर्माण झाली असावी.आज मात्र तोच लाखो वारकरी घरातच मास्क लावून एकांतात हे सावट दूर करण्यासाठी पांडुरंगाचरणी दिनपणे याचना करणार आहे.




वेगवेगळ्या दैवतांच्या तीर्थयात्रा आणि पंढरपूरची वारी यात मूलतः काही फरक आहे.काशी वा हरिद्वारची वारी होत नसते,तर ती तीर्थयात्रा असते,पण पंढरीची 'वारी'असते. तीर्थयात्रा ही प्रत्येक व्यक्तीस आपल्या सोयीनुसार परिस्थिती प्रमाणे करता येते,तिच्यासाठी कोणतेही काळवेळाचे बंधन नसते.मात्र पंढरपूरची वारी ही मात्र आषाढी आणि कार्तिकी एकादशी याच दिवशी होत असते.आणि चंद्रभागा नदीच्या तीरावर महाराष्ट्राचे जे लोकदैवत अठ्ठावीस युगे उभे आहे त्याच्याशी या वारीचा संबंध येतो.आणि त्याला उराउरी भेटण्यासाठी तहानभूक विसरून पायी चालत कष्टत लाखो लोकांचा महासागर पंढरपूर येथे एकत्र येत असतो.जनमानसात वारी म्हणजे 'पंढरीची वारी' असाच समज रूढ झालेला आहे.वारी आणि वारी करणारा वारकरी हा महाराष्ट्रीयच नव्हे,तर एकूणच भारतीय सांस्कृतिक परंपरेचा प्राणभूत घटक आहे.त्याचे ऊर्जाकेंद्र पंढरपूर आणि श्री विठ्ठल आहे.श्रीक्षेत्र पंढपूर-श्री विठ्ठल आणि वारकरी यांचे घट्ट संजीवक नाते आहे.महाराष्ट्रातून व महाराष्ट्राबाहेर दहा ते बारा लाख वारकरी पायी वारी,दिंड्या घेऊन तीस-चाळीस दिवसांपासून पंढरपूरला येत असतात. यापूर्वी सर्वच प्रकारच्या महासत्ता आल्या गेल्या त्यांची जुलूम जबरदस्ती झाली,प्लेगच्या आजाराच्या साथीसह महामारी, नैसर्गिक संकटे आली गेली परंतू वारीत 'अभंग' राहिली.

महाराष्ट्रातील मराठी संतांनी समाज प्रबोधनासाठी आणि भक्तिमार्गाच्या प्रचारासाठी पंढरीच्या वारीचा योग्य उपयोग करून घेऊन अंधश्रद्धा, कर्मकांड, व्रतवैकल्यांचा अतिरेक, जातीधर्मातील बेबनाव यांना पायबंद घालून एक विराट असे समूहमन तयार केले. त्यासाठी लोकपरंपरा,कीर्तन,प्रवचन,भजन यांचे सादरीकरणाचे माध्यम स्वीकारले.ओवी-अभंगांची रचना केली आणि वारीच्या प्रवासाला एक प्रयोजन मिळवून दिले.वारी करणे हा केवळ उपचार राहिला नाही तर,या दिंडी सोहळ्यात समूहमने तयार करून त्याच्यात एकच विचार एकच आचार मिळवून दिला आणि तो सर्वसमावेशक आणि सर्वंकष असा ठरला.समूहाचे मानसशास्त्र ओळखून या संप्रदायातील लोकमान्य धुरीणांनी परंपरेला धक्का न लावता परिस्थिती नुसार भक्तीविचारांचे नियमन केले,संघटन केले असे म्हणता येईल.

वारी म्हणजे पंढरपूरची वारी हे आपण गृहीतच धरलेले असते.संत ज्ञानदेव,संत नामदेव,संत एकनाथ,संत तुकाराम,संत निळोबाराय अशा नामवंत संतांनी वारकरी होण्यात धन्यता मानली.

*जाय जाय तू पंढरी ।होय होय वारकरी ।।*

असे संतांचे उदगार याची युगानुयुगे साक्ष देत आहेत.अशी ही वारी कधीपासून सुरु झाली.त्याचा प्रारंभ कोणी केला? वारीची ही रीत कोणी घालून दिली? ती केव्हापासून अस्तित्वात आली असावी? या प्रश्नांचे उत्तर निर्णायकपणे आजही कोणी देऊ शकत नाही.याचा निश्चित पुरावा उपलब्ध होत नाही.संत ज्ञानेश्वरांपूर्वी वारीची प्रथा होती हे मात्र निश्चित.ज्ञानेश्वरांचे वडील विठ्ठलपंत हे आषाढी-कार्तिकी वारीस पंढरपूरला गेल्याचा उल्लेख संत नामदेव महाराजांनी केला आहे.

वारीची प्रथा मुस्लिमपूर्व काळातही होती हे दाखवणारा शिलालेख धारवाड जवळच्या हेब्बळी गावात सापडला असून तो कन्नड भाषेत आहे.ताम्रपट व शिलालेख यांच्या आधारे पंढरपूर व तेथील विठ्ठल यांच्या इतिहासावर प्रकाश टाकण्याचे प्रयत्न इतिहास संशोधकांनी केलेले आहेत.डॉ भांडारकर, ग.ह.खरे,महाकवी दत्तोपंत बेंद्रे,डॉ दलरी, फरुकहार, स्टीव्हनसन, निकॉल मॅकनिकॉल,डॉ मिराशी,डॉ तुळपुळे वैगरे महाराष्ट्रीयन व पाश्चात्य संशोधकांनी पंढरपूरचा प्रामाणिक इतिहास शोधण्याचा प्रयत्न केला. तरीसुद्धा यांच्या प्राचीन स्वरूपाविषयी व प्रारंभकालाविषयी सर्वमान्य असे विधान कोणीही करू शकलेले नाही.

ज्ञानेश्वरीत अनेक ठिकाणी वारी शब्द येतो.अनेक ठिकाणी रसभरीत भक्तिपूर्ण वर्णन आढळते,

*आले आले हे हरीचे डिंगर । वीर वारीकर पंढरीचे ।।*

अशा शब्दात वारकऱ्यांचे सुंदर दर्शन घडवले आहे.वारीत भक्तिप्रधानता असते.देवाच्या दर्शनाबरोबरच संतदर्शनही महत्वाचे असते.म्हणून प्रत्येक शुद्ध एकादशीस देवाची तर वद्य एकादशीस संतांची वारी असते.पंढरी ही देवाची वारी,तर आळंदी ही संतांची वारी आहे.'वारी'शब्दाचा अर्थ म्हणजे 'येरझार'पंढरपूरची वारी करावयाची म्हणजे आपल्या घरुन पायीचालत पांडूरंगाच्या भेटीला पंढरपुरला जायचे आणि भगवंताला भेटून परत घरी यायचे.वारकरी वर्षातून अनेकदा वारीला जातात.

*'पंढरीचा वारकरी ।*
*वारी चुको न दे हरी ।।'*

या उदात्त भावनेने लाखोंच्या संख्येने भक्तगण या पायी वारीमध्ये सहभागी होतात आणि चालत २१ दिवसांचा प्रवास करत पंढरपूर च्या विठ्ठलाला येऊन भेटतात.

महाराष्ट्राच्या अध्यात्मिक आणि सांस्कृतिक विचारप्रवाहाच्या निर्मितीमध्ये आणि रक्षणामध्ये वारकरी संप्रदायाचे योगदान अतुलनीय आहे.मानवी जीवनाच्या ऐहिक आणि पारलौकिक कल्याणाचा अत्यंत प्रशस्त असा राजमार्ग वारकरी संतांनी घालून दिला आहे.

*मोडुनिया वाटा सूक्ष्म दुस्तर । केला राज्यभार चाले ऐसा ।। किंवा आड वाटे जाता लावी नीट सोई ।धर्मनीत तेही ऐसी आहे ।।या धर्मनितीला अनुसरून भुलों नेदी वाट।करी धरुनि दावी नीट ।।*

हे कार्य संतांनी केले आहे. आत्मकल्याणाचे मार्ग विशिष्ट अधिकारसंपन्नेतेच्या आग्रही अपेक्षांनी निश्चित झालेले असताना संतांनी सकल समाजासाठी आत्म आणि परकल्याणाचा मार्ग विस्तृत करून दिला,हे कार्य समाजपरिवर्तनाच्या दृष्टीने फार महत्वाचे ठरते.

समन्वयाकडे नेहमीच वारकरी संप्रदायाचा कल राहिला आहे.म्हणून इतकी वर्षे हा संप्रदाय टिकलाही आणि वृद्धिंगत होत आहे.नामासारखे सोपे साधन, रिकाम्या वेळेतील वारीची साधना,कीर्तनासारखे आत्मीय प्रबोधनाचे माध्यम गळ्यात तुळशीमाळ धारण करण्याने येणारे सहज वैराग्य,कपाळास गोपीचंदन आणि बुका या सहज क्रियेतून जीवनाचा सर्वांगीण उत्कर्ष वारकरी संप्रदाय साधून देतो,त्याचे सोपेपणा हेच त्याचे वेगळेपण आहे.महाराष्ट्रात अनेक पंथ-उपपंथ, संप्रदाय अनेक वर्षपासून गुण्यागोविंदाने नांदले.या संप्रदायात वैचारिक भेद जरूर होता.परंतु सर्वच सांप्रदायिकांनी ईश्वरभक्तीच्या माध्यमातून मानवतावादाचीच उपासना केली.त्यात नाथ महानुभाव, शैव, दत्त, सुफी,नागेश,समर्थ अशी मुख्य तर गाणपत्य, सूर्योपासक,शक्तीउपासक असेही उपपंथ निर्माण झाले.वैदिक आणि अवैदिक अशा परंपरा इथे परिपूष्ट झाल्या.तांत्रिक-मांत्रिकांची शाक्त उपासनाही महाराष्ट्रात आढळते. या सर्वांच्या उपासना पद्धतीत भिन्नता आहे.प्रत्येकाची देवता,उपासना पद्धती,व्रत,नियम यात भेद आहे.मात्र या पार्श्वभूमीवर वारकरी संप्रदाय निराळा उठून दिसतो.वारकरी संप्रदायाने विठ्ठल भक्तीची परंपरा निर्माण करून भक्तीच्या क्षेत्रात जे नवचैतन्य आणि मुक्ततेचे वातावरण निर्माण केले त्याला तोड नाही. वारकरी संप्रदायाने वैदिक आणि औपनिषादिक तत्वज्ञानाबरोबरच आजच्या दलित, ग्रामीण, स्त्रीवादी,जनवादी,कृषिनिष्ठ,पर्यावरणविषयक जाणिवा समृद्ध करणारे अशा विविध वाङ् मयीन संवेदनांचे बीजारोपणच केले नाही तर अध्यात्म दर्शनाबरोबरच या जाणिवांची पायाभरणी केली.त्यातूनच प्रेरणा घेऊन

*इवलेसे रोप लावियले द्वारी ।*
*तयाचा वेलू गेला गगनावरी ।।*

असे त्याचे प्रत्यंतर आज येताना दिसते.

आषाढ महिन्यातील शुद्ध एकादशीस जी ही यात्रा भरते त्या एकादशीस देवशयनीएकादशी असेही म्हणतात.आषाढी यात्रा ही पंढरीतील महायात्रा म्हणून सुद्धा ओळखली जाते.भगवंत या एकादशीपासुन शयन करतात.आषाढी एकादशीपासुन चातुर्मास चालु होत.चातुर्मासातअधिकाधिक विठ्ठल गुणांचे रुपाचे श्रवणकीर्तन करुन भक्तविठ्ठल प्राप्तीसाठी प्रयत्न करतात.वारकऱ्यांचे नव्हे,तर अनेक वैष्णवसंप्रदायांचे, केवळ महाराष्ट्रीयांचेच नव्हे तर कर्नाटक, आंध्र, तमिळनाडू,उत्तरप्रदेश,मध्यप्रदेशादि अनेक प्रांतातील अनेक लोकांचे,मराठी भाषिकांचेच नव्हे तर अनेकविध भाषिकांचे परमात्मा पंढरीनाथ हे आराध्य दैवत आहे.अनेक संतानी या देवाचे माहात्म्य गाइलेले आहे.स्वत: पांडुरंगाने नामदेवांच्या जवळ आपले गुपित सांगताना म्हटले आहे,

आषाढी कार्तिकी विसरु नका मज ।
सांगतसे गूज पांडुरंग ।।

शेकडो वर्षे झाली.काळ बदलला.यंत्रातंत्राचं आधुनिक युग आलं.पण आषाढी वारी सुरु आहे.एका पिढीची जागा दुसरी पिढी घेते.दर आषाढीला वारीची वाट संतप्रेमानं उचंबळून येते विठुनामाचा गजर टीपेला पोहोचतोआषाढी आणि कार्तिकी या दोन्ही वाऱ्या संप्रदायाने प्रमाणभूत मानल्या असून वारी चुकू नये म्हणून प्रत्येक वारकरी त्या परमेश्वराला विनंती करीत म्हणत असतो,

हेचि व्हावी माझी आस ।जन्मोजन्मी तुझा दास।
पंढरीचा वारकरी वारी चुको न दे हरी।।

श्रीविठ्ठल हा सुद्धा वारकरी लोकांचे उपास्यदैवत आणि सखा असल्याने

ऐसे आर्त ज्याचे मनी ।
त्याची चक्रपाणी वाट पाहे ।।

या भावनेने भक्तांची वाट पाहात अठ्ठावीस युगे ज्या विटेवरी उभा आहे

**- रवींद्र मालुसरे**
अध्यक्ष, मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई
९३२३११७७०४

पान १ वरुन

### आषाढी एकादशीला भाविकांची कसलीही

यांनी एस.टी. विभागाचे विभाग नियंत्रक यांना दिल्या आहेत. श्री क्षेत्र नारायणगड येथे सुरक्षाव्यवस्था, पार्किंग, दर्शन रांग याबाबतचे नियोजन करण्याच्या पोलीस विभागाला सूचना दिल्या आहेत. तसेच श्री क्षेत्र नारायणगड येथे येणाऱ्या भाविकांना आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी, आरोग्य पथकांची नेमणूक करण्याबाबतही जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक यांना कळविले आहे. यासोबतच श्री क्षेत्र नारायणगड येथे ४,५,६,७ जुलै रोजी अखंडित वीजपुरवठा सेवा देण्यासाठी उपाययोजना करण्याबाबतही महावितरण मंडळाचे अधिक्षक अभियंता यांना आ.संदीप क्षीरसागर यांनी सूचित केले आहे.

### आता वाळू वाहतूक होणार २४ तास;

जूननंतर काही घाटांवर मर्यादा आल्या असल्या तरी ज्या ठिकाणी पर्यावरण परवानगी आवश्यक नाही अशा घाटांवरून घरकुलांना वाळूचा पुरवठा थांबवण्यात येणार नाही. नवीन वाळू धोरणामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील पहिल्या निविदेतूनच राज्याला १०० कोटी रॉयल्टी मिळाली आहे. हे धोरण अर्थसंकल्पीय दृष्टिकोनातूनही राज्यासाठी लाभदायक ठरणार आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

### पालकमंत्री अजित पवारांच्या पुढाकाराने 'सीट्रिपलआयटी'

गरजेनुसार आवश्यक जागतिक दर्जाचे औद्योगिक, तांत्रिक प्रशिक्षण दिले जाणार आहे. यामुळे उद्योगांना त्यांच्या गरजेनुसार प्रशिक्षित मनुष्यबळ मिळेल तसेच युवकांना त्यांच्या इच्छेप्रमाणे रोजगार मिळवणे, स्वयंरोजगार करणे शक्य होणार आहे.

'सीआयआयआयटी'च्या स्थापनेनंतर पहिल्या तीन वर्षांसाठी प्रशिक्षणाचा खर्च 'टाटा टेक्नॉलॉजी' उचलणार आहे. त्यानंतर प्रशिक्षणाचा खर्च 'टाटा टेक्नॉलॉजी' आणि जिल्हा प्रशासन दरवर्षी प्रत्येकी पन्नास टक्क्यांप्रमाणे विभागून उचलणार आहेत. यामुळे बीड जिल्ह्यातील हजारो युवकांना उद्योगक्षेत्राच्या गरजेप्रमाणे औद्योगिक, तांत्रिक प्रशिक्षण मिळेल. त्यांची कौशल्यवृद्धी होईल. उद्योगांना त्यांच्या गरजेप्रमाणे प्रशिक्षित मनुष्यबळ मिळेल. यातून जिल्ह्यात उद्योगपुरक वातावरण निर्माण होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

## बेदरकार गाडी चालवणाऱ्यांना विमा भरपाई नाही-सर्वोच्च न्यायालय

नवी दिल्ली : भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने वाहन चालवणाऱ्यांसाठी एक महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे जो भविष्यकाळात रस्त्यावरील वाहतूक नियमांचे पालन करण्यासाठी प्रेरणा देणारा ठरू शकतो. न्यायालयाने स्पष्ट केले आहे की बेफिकीरपणे आणि वेगाने वाहन चालवणाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे झालेल्या अपघातात त्यांचा मृत्यू झाल्यास विमा कंपनी त्यांच्या कुटुंबीयांना भरपाई देण्यास बाध्य नाही.

हा निर्णय एन.एस. रवीश यांच्याशी संबंधित प्रकरणावर आधारित आहे. १८ जून २०१४ रोजी घडलेल्या या दुर्घटनेची सुरुवात तेव्हा झाली जेव्हा रवीश हे त्यांच्या वडील, बहीण आणि मुलांसह कारने प्रवास करत होते. मालनहल्लीजवळ त्यांच्या गाडीवरील नियंत्रण सुटले आणि भीषण अपघात झाला.

या अपघातामागील कारणे तपासताना असे स्पष्ट झाले की रवीश हे अत्याधिक वेगाने आणि बेपर्वाईने गाडी चालवत होते. त्यांच्या या निष्काळजीपणामुळेच हा अपघात घडला आणि त्यात त्यांचा मृत्यू झाला. पोलिसांच्या तपासणीतही ही बाब स्पष्ट झाली होती.

रवीश यांच्या मृत्यूनंतर त्यांची पत्नी, मुलगा आणि पालकांनी विमा कंपनीकडे ८० लाख रुपयांची भरपाई मागितली होती. परंतु पोलिसांच्या आरोप पत्रात रवीश यांनाच या अपघातासाठी थेट जबाबदार ठरवण्यात आले होते. या आधारावर मोटार अपघात दावा न्यायाधिकरणाने (एमएसीटी) त्यांचा दावा फेटाळून लावला.

या निर्णयावर असमाधानी असलेल्या कुटुंबीयांनी कर्नाटक उच्च न्यायालयात अपील दाखल केले. त्यांनी आपला युक्तिवाद बदलत असा दावा केला की अपघात टायर फुटल्यामुळे झाला होता, रवीश यांच्या चुकीमुळे नाही. परंतु उच्च न्यायालयाने या दाव्याला फारसे महत्त्व दिले नाही.

उच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, सर्व पुराव्यांचे परीक्षण करता मृत व्यक्ती त्यांच्या निष्काळजीपणामुळेच अपघाताला कारणीभूत ठरली होती. त्यामुळे विमा कंपनी भरपाई देण्यास बाध्य नाही, असा निर्णय त्यांनी दिला.

अंतिम उपाय म्हणून कुटुंबीयांनी सर्वोच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावला. न्यायमूर्ती पी.एस. नरसिंह आणि आर. महादेवन यांच्या खंडपीठाने या संपूर्ण प्रकरणाचा सखोल अभ्यास केला. सर्व पुराव्यांचे आणि कायदेशीर मुद्द्यांचे परीक्षण करून त्यांनी उच्च न्यायालयाच्या निर्णयाला मान्यता दिली.

सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने आपल्या निर्णयात स्पष्टपणे नमूद केले, जेव्हा अपघात मृत व्यक्तीच्या स्वतःच्या निष्काळजीपणामुळे होतो, तेव्हा विमा कंपनीवर कोणतीही भरपाईची जबाबदारी राहात नाही. हा निर्णय कायदेशीर तत्त्वावर आधारित आहे की कोणीही व्यक्ती स्वतःच्या चुकीचा फायदा घेऊ शकत नाही.

# महाराष्ट्रात ३ महिन्यांत ७६७ शेतकऱ्यांनी जीवन संपवलं, सरकार काय करते? राहुल गांधी आक्रमक!

**नवी दिल्ली । वृत्तसेवा**

महाराष्ट्रात तीन महिन्यांत ७६७ शेतकऱ्यांनी जीवन संपवलं आहे. ही केवळ आकडेवारी नाही, तर ७६७ कुटुंबांचा उध्वस्त झालेला संसार आहे. शेतकऱ्यांचे हे दुखः आणि त्यांचा आक्रोश महाराष्ट्राच्या मातीशी जोडलेला आहे. पण सरकार? ते आपल्या जनसंपर्काच्या (झठ) तमाशात मग्न आहे, असा आरोप काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केला आहे.

महाराष्ट्रातील शेतकरी कर्जाच्या खोल डबक्यात अडकला आहे. बियाणे, खते, डिझेल यांच्या किमती गगनाला भिडल्या आहेत, पण शेतमालाला हमीभाव (चडझ) मिळत नाही. शेतकरी आपल्या पिकाला योग्य किंमत मिळेल, याची वाट पाहतात, पण बाजारात त्यांची लूट होते.

यवतमाळ, अमरावती, आणि विदर्भातील इतर भागांमध्ये शेतकरी जीवन संपवत आहेत. गेल्या काही वर्षांत, विशेषतः दुष्काळ आणि अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. कर्जमाफीची मागणी करणाऱ्या शेतकऱ्यांना सरकारकडून दुर्लक्षित केले जाते, तर दुसरीकडे मोठमोठ्या उद्योगपतींची अब्जावधींची कर्जे माफ होतात. उदाहरणार्थ, अनिल अंबानी यांच्या ४८,००० कोटींच्या कर्जाला फसवणूक म्हणून घोषित करण्यात आले, पण त्यावर कारवाई का होत नाही? असा प्रश्न देखील राहुल गांधी यांनी उपस्थित केला.

**अन्नदाता का उपेक्षित?**

विदर्भ, मराठवाडा, आणि खानदेश येथील शेतकरी कापूस, सोयाबीन, आणि तूर यांसारख्या पिकांवर अवलंबून आहेत. पण, गेल्या काही वर्षांत शेतीचा खर्च वाढला, तर उत्पन्न घटले. केंद्र सरकारने शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे आश्वासन दिले होते, पण आज शेतकऱ्यांची अवस्था अशी आहे की, त्यांचे आयुष्यच अर्धे होत असल्याचे राहुल गांधी म्हणाले.

राहुल गांधी यांनी हा मुद्दा उपस्थित करताना म्हटले आहे की, सरकार शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहत नाही. त्याऐवजी, ते आपल्या जनसंपर्काच्या तमाशात व्यस्त आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना कर्जमाफी, हमीभाव, आणि शेतीसाठी पायाभूत सुविधांची गरज आहे, पण सरकारच्या प्राधान्यक्रमात हे प्रश्न कुठे दिसतात?

**शेतकरी की उद्योगपती?**

राहुल गांधी यांनी सरकारवर आरोप केला आहे की, जिथे शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्याची वेळ येते, तिथे सरकार माघार घेते; पण मोठ्या उद्योगपतींची अब्जावधींची कर्जे सहज माफ होतात. यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष वाढत आहे. विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकरी आंदोलने ही याची साक्ष आहेत. सरकारने पीक विमा योजना आणि कर्जमाफी योजनांचा गाजावाजा केला, पण प्रत्यक्षात किती शेतकऱ्यांना याचा लाभ मिळाला? यवतमाळमधील शेतकरी सांगतात की, विमा कंपन्या आणि बँका त्यांना वेठीस धरतात. दुष्काळग्रस्त भागात पाण्याची सोय, वीजपुरवठा, आणि बाजारपेठेतील सुधारणा यांचा अभाव आहे. यामुळे शेतकरी हताश होऊन टोकाचे पाऊल उचलतात.

**उपाय काय? शेतकऱ्यांना कसे वाचवायचे?**

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवायच्या असतील, तर सरकारला ठोस पावले उचलावी लागतील. सर्वप्रथम, शेतकऱ्यांना कर्जमाफी आणि हमीभावाची हमी द्यावी लागेल. दुसरे, शेतीसाठी



पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक वाढवावी लागेल. सिंचन योजना, ग्रामीण रस्ते, आणि शीतगृहे यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान कमी होऊ शकते, असा सल्ला देखील राहुल गांधींनी दिला आहे.

# राज्यात दरवर्षी कापसाचे अंदाजे किती उत्पन्न होते? उच्च न्यायालयाने सरकारकडे मागविली माहिती

**नागपूर । प्रतिनिधी**

राज्यात नेमकी किती क्षेत्रात कापसाची शेती होते, दरवर्षी अंदाजे किती उत्पन्न होते याचा तपशील द्या, असे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने राज्य सरकारला दिले आहेत.

कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने (सीसीआय) दोन आठवड्यांत ही माहिती सादर करावी, असे आदेश न्यायालयाने दिले आहेत. त्यानंतर सीसीआयने कापस खरेदी केंद्रांबाबत धोरण ठरवून न्यायालयात अहवाल द्यायचा आहे.

ग्राहक पंचायत महाराष्ट्रचे श्रीराम सातपुते यांनी ही जनहित याचिका दाखल केली आहे. त्यावर बुधवारी न्यायमूर्ती नितीन सांबरे आणि न्यायमूर्ती सचिन देशमुख यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. याचिकेनुसार, सरकारी कापूस खरेदी केंद्रे वेळेवर सुरू होत नसल्याने व्यापारी शेतकऱ्यांकडून हमीभावापेक्षा कमी दराने खरेदी करतात. यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते. त्यामुळे सर्व तालुक्यांमध्ये दिवाळीपूर्वी खरेदी केंद्रे सुरू करावीत व विक्रीनंतर सात



दिवसांत शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा व्हावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

याचिकेवर उत्तर देताना सीसीआयने सांगितले की, राज्यात एक ऑक्टोबर २०२४ पासून १२१ केंद्रे सुरू करण्यात आली असून, आणखी सात केंद्रे मागणीनुसार सुरू करण्यात आली. एकूण १२८ केंद्रे सुरू आहेत. मात्र, याचिकाकर्त्यांनी हा दावा फेटाळत सांगितले की, डिसेंबर-जानेवारीत काही केंद्रांसाठी निविदा काढण्यात आल्या असल्याने ती केंद्रे ऑक्टोबरपासून सुरू नव्हती. यावरून सीसीआयने न्यायालयात चुकीची माहिती दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. याचिकेवर पुढील सुनावणी २८ जुलै रोजी होणार आहे. सातपुते यांनी स्वतः न्यायालयात बाजू मांडली.

# राज्यातील शाळांमधील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची भरती आता कंत्राटी पद्धतीने

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील शाळांमध्ये चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची भरती आता कंत्राटी पद्धतीने केली जाणार असल्याची अधिकृत घोषणा आज विधानपरिषदेत करण्यात आली. या निर्णयामुळे शाळांमध्ये शिपाई आणि इतर सहाय्यक पदांसाठी पारंपरिक कायमस्वरूपी भरतीऐवजी कंत्राटी पद्धतीचा अवलंब केला जाणार आहे. याची घोषणा शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी केली आहे.

राज्यातील सर्व शाळांमध्ये यापुढे फक्त शिपाई नाही तर सर्व चतुर्थ श्रेणी कर्मचारी हे कंत्राटी पद्धतीने भरण्यात येतील. या निर्णयापासून जे कर्मचारी आता आहेत ते निवृत्त होईपर्यंत राहतील पण त्यांची जागा रिक्त झाल्यावर त्यापुढे त्यांच्या जागेवर कंत्राटी कर्मचारी भरती केले जाणार अशी माहिती शिक्षण मंत्री दादा भूसे यांची विधान परिषदेत दिली. ,

पुढे एका प्रश्नाचे उत्तर देताना शासन विद्यार्थ्यांची घटती पटसंख्या, शाळाबाह्य विद्यार्थी आणि शिक्षणाच्या गुणवत्तेसंदर्भात गंभीर असून सर्वंकष उपाययोजना राबवित आहे. यु-डायस (णऊखडए) प्रणालीच्या आकडेवारीनुसार विद्यार्थ्यांची संख्या काहीशी घसरलेली असली तरी त्यामागील कारणे समजून घेऊन योग्य ती कार्यवाही केली जात असल्याचे शालेय शिक्षण मंत्री यांनी अर्धातास चर्चेला उत्तर देताना सांगितले.

**विरोधकांकडून जोरदार आक्षेप**

दरम्यान दादा भुसे यांनी केलेल्या घोषणेमुळे विधानपरिषदेत चांगलाच गदारोळ झाला. विरोधकांनी शाळांमध्ये शिपाई यांची भरती कायमस्वरूपी झाली पाहिजे अशी मागणी करत विरोधकांकडून हा जोरदार मुद्दा लावून धरला. तसेच शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्याकडून उत्तर अपेक्षित आहे अशी मागणी केली. अनेक शाळामंध्ये जास्त मुली शाळांमध्ये शिक्षण घेत असतात . त्यामुळे त्याच्या सुरक्षेचा प्रश्न आहे. त्यामुळे कायमस्वरुपी भरती झाली पाहिजे.

# भौगोलिक परिस्थितीनुसार पारंपरिक कृषी पंप देण्याचा शासनाचा विचार-राज्यमंत्री मेघना बोर्डीकर-साकोरे

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्य शासनाने सौर ऊर्जेवर आधारित कृषी पंप देण्यावर भर दिला आहे. मात्र भौगोलिक परिस्थितीनुसार सौर पंप देणे शक्य नसल्यास त्या ठिकाणी पारंपरिक कृषी पंप देण्याबाबत शासन विचार करेल. शेतकऱ्यांसाठी कृषी पंपांना वीज जोडणी देण्यासंदर्भात लवकरच बैठक घेऊन याबाबत सकारात्मक निर्णय घेतला जाईल, अशी माहिती ऊर्जा राज्यमंत्री बोर्डीकर-साकोरे यांनी विधानसभेत अर्धा तास चर्चेच्या उत्तरात दिली.

विधानसभा सदस्य सुधीर मुनगंटीवार यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या शेतात लावण्यात आलेल्या सीआरआय कंपनीच्या सोलार पंपाच्या तक्रारीबाबत मुद्दा उपस्थित केला होता. या चर्चेत सदस्य शेखर निकम यांनीही सहभाग घेतला.

राज्यमंत्री श्रीमती बोर्डीकर-साकोरे यांनी सांगितले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०३० पर्यंत देशातील ५० टक्के वीज अपारंपरिक स्त्रोतांतून निर्मित करण्याचे उद्दिष्ट जाहीर केले आहे. त्याला अनुसरून शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध व्हावी, यासाठी राज्यातही सौर



ऊर्जेच्या वापराला प्रोत्साहन दिले असून मागेल त्याला सौर पंप देण्याची योजना सुरू केली आहे. विशेष म्हणजे सौर पंप घेणाऱ्या शेतकऱ्यांना शासनाकडून अनुदान दिले जात असल्याचेही त्यांनी सांगितले.

चंद्रपूर जिल्ह्यात सी.आर.आय. कंपनीमार्फत लावण्यात आलेल्या सौर कृषी पंपांबाबत आलेल्या तक्रारींची तातडीने दखल घेऊन कंपनीला १३ लाखाचा दंडही करण्यात आला असल्याचेही राज्यमंत्री श्रीमती बोर्डीकर-साकोरे यांनी यावेळी सांगितले. या कंपनीच्या सौर कृषी पंपांबाबत १८३ शेतकऱ्यांनी ५४४ तक्रारी नोंदवल्या होत्या. यातील ५४२ तक्रारींचे निवारण करण्यात आले असून, उर्वरित दोन तक्रारी पाण्याचा स्त्रोत कोरडा झाल्यामुळे निर्माण झालेल्या आहेत. जिथे पाण्याची पातळी खालावली आहे, अशा ठिकाणी बुस्टर पंप बसवून नदी किंवा जलस्रोतांमधून शेतापर्यंत पाणी पोचविण्यात येत आहे, असेही राज्यमंत्री श्रीमती बोर्डीकर-साकोरे यांनी सांगितले.

# संजय गांधी निराधार योजना, नमो किसान योजनेच्या लाभार्थी तसेच ज्या शासकीय सेवेत कार्यरत आहेत 'त्या' महिलांना योजनेचा लाभ देणे केले बंद

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील महिलांसाठी अत्यंत महत्त्वाची असलेल्या लाडकी बहीण योजनेबाबत एक महत्त्वाचे अपडेट आले आहे. खरंतर या योजनेवरून सातत्याने सत्ताधारी आणि विरोधकांममध्ये आरोप-प्रत्यारोप, वाद-प्रतिवाद सुरू असतात. महायुतीला सत्तेत आणण्यास कारणीभूत ठरलेल्या प्रमुख घटकांपैकी एक असणाऱ्या या योजनेवरून विरोधातील महाविकास आघाडी सातत्याने प्रश्नचिन्ह उपस्थित करत असते. तर वेळोवेळी याबाबत सरकारकडूनही अपडेट दिले जातात.

आता अशी माहिती समोर आली आहे की, २ हजार २८९ महिला ज्या सरकारी कर्मचारी होत्या, त्यांना लाडकी बहीण योजने अतंर्गत लाभ देणे बंद केले गेले आहे. राज्याच्या महिला व बाल विकासमंत्री आदिती





तटकरे यांनी महाराष्ट्र विधानसभेत ही माहिती दिली आहे.

आदिती तटकरे म्हणाल्या, महाराष्ट्र सरकारने केलेल्या पडताळणीत आढळले आहे की, २ हजार २८९ महिला सरकारी कर्मचारी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी होत्या. त्या सर्व महिलांची ओळख पटली आहे आणि आता या महिलांना लाडकी बहीण योजनेचा लाभ देणे बंद करण्यात आले आहे.

**या महिलांना लाभ मिळणार नाही**

ज्या महिला आधीपासून अन्य योजना जसे की, संजय गांधी निराधार योजना (दोन लाख महिला), नमो किसान योजना(७.७०लाख महिला) जुडलेल्या आहेत. ज्या शासकीय सेवेत कार्यरत आहेत, आता यातील संख्या ५० हजारांपर्यंत जाऊ शकते.

तसेच, सरकारचे म्हणणे आहे की, सरकारी विभागांमध्ये ज्या महिला कार्यरत आहेत, त्यांनी तत्काळ लाडकी बहीण योजनेतून मिळालेले हप्ते परत करावेत अन्यथा त्यांच्याविरोधात कारवाई होईल. कारण, या योजनेचा नियमच आहे की सरकारी कर्मचारी असलेल्या महिलांना या योजनेचा लाभ मिळू शकत नाही.

याशिवाय, अशा महिला ज्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न अडीच लाखांपेक्षा अधिक आहे. २५ लाख महिला आहेत, ज्यांची छाननी केली जात आहे. तसेच अन्य कारणांमुळे अयोग्य आढळलेल्या १५ लाखांपेक्षा अधिक महिलांचीही छाननी केली जात आहे.

# अधिवेशनात कांद्याला गुजरातप्रमाणं अनुदान जाहीर करा; कांदा उत्पादक शेतकरी आक्रमक

**नाशिक । प्रतिनिधी**

कांदा उत्पादक शेतकरी गेल्या अनेक वर्षापासून अडचणीत आहे. कांद्याला योग्य भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च देखील निघत नाही. गुजरात सरकारने कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी २०० रुपये प्रतिक्विंटल अनुदान जाहीर केलं आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्र सरकारनं कांदा उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिक्विंटल ५०० रुपये अनुदान जाहीर करावं, अशी मागणी महाराष्ट्र कांदा उत्पादक संघटनेनं केली आहे. पावसाळी अधिवेशनात निर्णय घेण्याची विनंती करण्यात आली आहे.

महाराष्ट्रामध्ये कांदा हे शेतकऱ्यांचं मुख्य पीक आहे. दरवर्षी लाखो क्विंटल कांद्याचं उत्पादन एकट्या महाराष्ट्रात होतं. मात्र, मागील दोन वर्षापासून उत्पादन खर्च देखील निघत नसल्यानं कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत सापडला आहे. कांदा निर्यातीवरील सरकारचं धोरण, नैसर्गिक आपत्ती यामुळं कांदा उत्पादक शेतकरी कर्जबाजारी झाला आहे. अशात कांदा उत्पादक शेतकऱ्यांना संकटातून बाहेर काढण्यासाठी राज्य सरकारनं शेतकऱ्यांना प्रतिक्विंटल पाचशे रुपये अनुदान जाहीर करावं, अशी मागणी महाराष्ट्र कांदा उत्पादक संघटनेनं केली आहे.

**पाचशे रुपये अनुदान जाहीर करावं**

गुजरात राज्यात महाराष्ट्र पेक्षा कमी प्रमाणात कांद्याचं उत्पादन घेतलं जातं. असं असताना गुजरात सरकारनं तेथील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिक्विंटल ५०० रुपये अनुदान जाहीर केलं आहे. अशात महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचा कांदा हे प्रमुख नगदी पीक आहे. यासाठी कांदा उत्पादक शेतकऱ्यांना किमान ५०० रुपये प्रतिक्विंटल अनुदान तातडीनं जाहीर करावं. सध्या महाराष्ट्र सरकारचं पावसाळी अधिवेशन सुरू आहे. यात सरकारनं याची घोषणा करावी, अशी मागणी महाराष्ट्र कांदा उत्पादक संघटनेनं केली आहे..

**जाचक अटी आणि कमी दर**

दराचा विचार करता बाजार समितीमध्ये सरासरी १६०० तर जास्तीत जास्त २२०० प्रतिक्विंटल दर मिळत आहे. त्यामुळे दोन्ही ठिकाणच्या दरात ४०० ते ५०० रुपयांची तफावत आहे. तसेच सरकारच्या कांदा खरेदीसाठी असलेल्या जाचक अटी आणि कमी दर यापेक्षा कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये विक्री केलेल्या कांद्याला चांगला दर मिळत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा कल बाजार समितीमध्येच विक्री करण्याकडे आहे. नाफेडच्या कांदा खरेदीलाचा कुठलाही फायदा होणार नसल्याचं शेतकऱ्यांचं म्हणणं आहे.

# धारावी पुनर्विकास की देवेनार डंपिंगची डील? २३६८ कोटींचा 'कचरा प्रकल्प' कोणाच्या फायद्याचा?-नाना पटोले

## लाडक्या उद्योगपतीसाठी राज्य सरकार व बीएमसीकडून पायघड्या, घरे अदानी बांधणार, महापालिका जागा मोकळी करून देणार आणि खर्च मुंबईकरांच्या पैशातून करणार

**मुंबई । प्रतिनिधी**

धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या नावाखाली मुंबई महापालिकेवर २३६८ कोटी रुपयांचा मोठा आर्थिक भार टाकण्यात आला आहे. प्रकल्पातून अपात्र ठरणाऱ्या धारावीतील नागरिकांना रेंटल हाउसिंगमध्ये स्थलांतरित करण्यात येणार असून, यासाठी अदानी धारावी पुनर्विकास प्रा. लि. तब्बल ५०,००० घरे उभारणार आहे. मात्र ही घरे बांधण्यासाठी जागा मिळावी म्हणून देवनार डम्पिंग ग्राउंड खाली करण्याचा प्रस्ताव २०२४ मध्ये मंजूर करण्यात आला.

ही धारावी पुनर्विकास की देवेनार डंपिंगची डील आहे? आणि २३६८ कोटींचा 'कचरा प्रकल्प' कोणाच्या फायद्याचा? असा प्रश्न काँग्रेस चे ज्येष्ठ नेते नाना पटोले यांनी विचारला आहे.

यासंदर्भात बोलताना नाना पटोले म्हणाले की, हा निर्णय तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मंत्रिमंडळ बैठकीत ऑक्टोबर २०२४ मध्ये घेण्यात आला. १९२७ पासून अस्तित्वात असलेल्या देवनार डम्पिंग ग्राउंडवर १८५ लाख मेट्रिक टन कचरा साचलेला आहे. आता मुंबई महापालिकेवर या कचऱ्याच्या सफाईची जबाबदारी सोपवण्यात आली आहे, ज्यासाठी २३६८ कोटी



रुपये खर्च होणार आहेत. दररोज तब्बल २३००० मेट्रिक टन कचरा उचलण्याची महापालिकेची तयारी सुरू आहे आणि त्यासाठी घनकचरा व्यवस्थापनातील आतापर्यंतचं सर्वात मोठं टेंडर तीन वर्षांसाठी काढण्यात आलं आहे.

या प्रकल्पावर अनेक गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. घरे अदानी बांधणार, जागा महापालिकेने मोकळी करून द्यायची, आणि त्यासाठीचा सर्व खर्च देखील मुंबईकरांच्या आणि राज्यातील जनतेच्या कररूपातील पैशातून - ही योजना खरोखरच लोकहिताची आहे का? असे पटोले म्हणाले.

नाना पटोले पुढे म्हणाले की, या कचऱ्याच्या सफाईवर मोठ्या प्रमाणात स्पर्धा सुरू झाली आहे. कचऱ्याच्या वाटपासाठीही राजकारण चालू असल्याची चर्चा आहे. धारावीच्या प्रकल्पग्रस्तांना सुरुवातीला समुद्रकिनारी पुनर्वसनाचे स्वप्न दाखवण्यात आले होते, पण आता देवनारमध्ये स्थलांतर करण्याचे नियोजन सुरू आहे - तेही हजारो कोटी खर्च करून.

ही संपूर्ण योजना म्हणजे सरकार आणि महापालिकेने कचऱ्यातूनही कमाई करण्याचा डाव आहे का? सुप्रीम कोर्टाने एका प्रकरणात राज्य सरकारच्या कारभारात ३००० कोटींच्या वर भ्रष्टाचार झाल्याचं स्पष्ट केलं आहे. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांमधील गँगवॉरचं हा प्रत्यक्ष परिणाम आहे का, असा प्रश्न निर्माण होत आहे. मंत्रिमंडळातील या गँगवॉर बद्दल मुख्यमंत्र्यांनी खुलासा करावा असेही नाना पटोले म्हणाले.

# बार्टी, सारथी, महाज्योती, आर्टी संस्थांच्या कार्यपद्धतीत समानता, सुसुत्रता आणणार-उपमुख्यमंत्री अजित पवार

मुंबई । प्रतिनिधी

बार्टी, सारथी, महाज्योती, आर्टी या संस्थांमध्ये विद्यार्थ्यांना गुणवत्तेच्या आधारावर विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेश देण्यात येणार असून या संस्थांमधील विद्यार्थ्यांची संख्या, सर्वसाधारण शिष्यवृत्ती, परदेशी शिष्यवृत्ती, प्रवेश प्रक्रियेबाबत समान धोरण राबविण्यात येईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधान परिषदेत दिली.

विधान परिषद सदस्य संजय खोडके, अभिजीत वंजारी यांनी 'छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण आणि मानव विकास संस्थे'कडून (सारथी) घरभाडे भत्ता आणि आकस्मितता निधी वितरणाबाबत विचारलेल्या प्रश्नावर उत्तर देताना उपमुख्यमंत्री तथा वित्त



व नियोजन मंत्री अजित पवार बोलत होते. ते पुढे म्हणाले की, सारथी संस्थेमध्ये २०१८ ते २५ या कालावधीत ८३ अभ्यासक्रमांमध्ये ३ लाख विद्यार्थ्यांना शासनामार्फत विद्यावेतन, शिष्यवृत्ती आदी लाभ देण्यात आले. त्यापैकी ३ हजार म्हणजे केवळ एक टक्का विद्यार्थ्यांनी पीएचडी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतला होता. त्या एक टक्का विद्यार्थ्यांसाठी २८० कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आला. पाच वर्षात एका विद्यार्थ्यामागे ३० लाख रुपये खर्च झाला, ही बाब गांभीर्याने घेण्यासारखी आहे. यापुढच्या काळात ज्या अभ्यासक्रमांच्या आधारे रोजगार मिळेल, अशाच अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

बार्टी, सारथी, महाज्योती, आर्टी या संस्थांमध्ये विद्यार्थी संख्या, प्रवेश प्रक्रिया, शिष्यवृत्ती यांची संख्या ठरविणे आणि गुणवत्ता वाढ यासंदर्भात मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. या समितीचा अहवाल आता प्राप्त झालेला आहे. त्या संदर्भात लवकरच निर्णय घेण्यात येईल, असेही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट केले.

# आरोग्य विभागाच्या विविध सेवांचा जिल्हाधिकारी यांनी घेतला आढावा




**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय एड्स प्रतिबंध व नियंत्रण, राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण, राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण, पीसीपीएनडीटी, फ्लोरेसीस, मौखिक आरोग्य या आरोग्य विभागांच्या कार्यक्रमांसह, रुग्ण कल्याण समिती, १०८ रुग्णवाहिका, महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य, आयुष्यमान भारत आदी योजना, आरोग्य विभागाकडून रुग्णांना देण्यात येणाऱ्या सेवांचा आढावा जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आज घेतला.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती सभागृहात हा आढावा घेण्यात आला. यावेळी त्यांनी आरोग्य सेवेतील अधिकारी, कर्मचाऱ्यांना योग्य त्या सूचनाही केल्या. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.संजय राऊत, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.उल्हास गंडाळ, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.महेशकुमार माने, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. अमृता मुळे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी सुहास कुलकर्णी आदींसह आरोग्य विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राऊत व डॉ. गंडाळ यांनी आरोग्य विभागांतर्गत सेवा देण्यात असलेल्या विविध सेवांचा तपशील यावेळी सादर केला. आरोग्य सेवा देत असलेले सर्व कार्यक्रम प्रमुख यांनी आपापल्या विभागातील कामकाजांबाबत सविस्तर माहिती सादर केली.

# चकलांबा पोलीस ठाणे हददीतील महारटाकळी येथून २७ लाख ३ हजारांची वाळू व यंत्रसामग्री जप्त

गेवराई । प्रतिनिधी

पोलिस ठाणे कार्यक्षेत्रातील अवैध धंद्याविरुध्द गेवराईच्या चकलांबा पोलिस ॲक्शन मोडवर असून काल नदीपात्रातून अवैध वाळू उपसा करुन तस्करी करत असलेल्या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून, २७ लाख तीन हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

बीड जिल्हा सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर एसपी नवनीत काँवत यांनी गुन्हेगाराविरुध्द कडक कारवाईच्या सुचना संबंधित पोलीस ठाणे यांना दिलेल्या आहेत. याच अनुषंगानेच गेवराईतील चकलांबा पोलिस ठाणे



कार्यक्षेत्रातील महारटाकळी येथून अवैध वाळू उपसा करुन वहातूक करुन वाळूची तस्करी होत असल्याची माहीती एपीआय संदीप पाटील यांना मिळताच काल बुधवारी (ता २)ते आपल्या पोलिस कर्मचाऱ्यासह महारटाकळीत दाखल झाले असता एक जेसीबी ट्रॅक्टरच्या ट्रॉलीत वाळू भरत असल्याचे दिसून आले.

एक ट्रॅक्टर अन् जेसीबीसह एकुण २७ लाख ३ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला असून,याप्रकरणी विकास केसभट(रा.गायकवाड जळगाव ता गेवराई)व मोहम्मद शेख(सुकळी ता.शेवगाव जि.अहिल्यानगर)या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले.

## राम कृष्ण हरी जय हरी विठ्ठल...



पाटोदा येथेल शालेय विद्यार्थ्यांनी दिंडी सोहळा संपन्न केला या बाल वारकरी विठ्ठलाच्या जयघोषात तल्लीन होऊन शहरत दिंडी सोहळा प्रदक्षणा करताना हे बोलके छायाचित्र....

# श्री क्षेत्र पंढरपूर येथील मठ मंदिर उद्घाटन सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित रहा–महंत महादेवानंद भारती महाराज

**मा.आ.सुरेश धस व साधु–संतांच्या हस्ते होणार उध्दघाटन.**

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील श्री. क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थांनचे मठाधिपती महंत गुरुवर्य श्रीश्री १००८ ह.भ.प. महादेवानंद भारती महाराज यांच्या नियोजनात व संकल्पनेतून श्री. क्षेत्र पंढरपूर शेगाव दुमाला येथे भव्य- दिव्य महादेवानंद भारती बाबा मठ श्री. छत्रपती शिवाजी महाराज मंदिर व अश्वत्थ पशुपतीनाथ मंदिर उभारले आहे. या मठ मंदिराचे आषाढी वारी निमित्त शनिवार दिनांक ०५/०७/२०२५ रोजी दुपारी ३:३० वा. पंढरपूर येथे उध्दगाटन संपन्न होत आहे. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन महंत गुरुवर्य श्रीश्री १००८ ह.भ.प. महादेवानंद भारती महाराज यांनी केले आहे.

उद्घाटन सोहळा आमदार सुरेश धस (आष्टी-पाटोदा-शिरूर विधानसभा) तसेच अनेक साधु- संत- महंत यांच्या शुभहस्ते होणार असून कार्यक्रमाचे अध्यक्ष आ.अभिजीत पाटील माढा मतदारसंघ तसेच प्रमुख उपस्थिती



बीड जिल्ह्याचे खासदार व आजी-माजी आमदार पंढरपूर, सोलापूर परिसरातील आमदार तसेच नगराध्यक्ष, उद्योजक, विविध ठिकाणचे नगरसेवक, जि.प.सदस्य, विविध पक्षाचे पदाधिकारी, उच्चपदित अधिकारी, सरपंच-उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य यांची उपस्थिति लाभणार आहे.

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी, अंमळनेर, कोतन, गांधनवाडी, पांढरवाडी, सकुंडवाडी, माळेवाडी, भडकेल, खोपटी, डोंगरकिन्ही, जाटनांदूर, पांगरी, घोळेवाडी, जाधवाडी, गायकवाडी परिसरातील अनेक भाविक पंढरपूर या श्री. क्षेत्र ठिकाणी श्री. विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन घेण्यासाठी पंधरवाडी, महिना एकादशी वारी, कार्तिक आषाढी, एकादशी उत्सवासाठी तसेच वेळ भेटेल तेव्हा मोठ्या संख्येने जातात. या परिसरातील भाविक- भक्तांची मुक्कामाची गैरसोय होऊ नये म्हणून महंत गुरुवर्य महादेवानंद भारती महाराज यांनी या परिसरातील भाविक- भक्तांसाठी हक्काचा मठ म्हणून भव्य- दिव्य महादेवानंद भारती बाबा मठ या नावाने उभारून भाविक- भक्तांना मोठा आधार प्राप्त करून दिला आहे. या भव्य- दिव्य मठात उन्हाळा, पावसाळा, हिवाळा मोसमात पंढरीत हजारोंच्या संख्येने येणाऱ्या भाविकांची मुक्कामाची व्यवस्था होणार आहे. श्री. क्षेत्र पंढरपूर येथील शेगाव दुमाला या प्रशस्त परिसरात मठाची भव्य वास्तू उभारली आहे.

# आष्टीत रंगला संस्कृती विद्यामंदिर शाळेचा आषाढी पायी दिंडी सोहळा

आष्टी । प्रतिनिधी

आषाढी एकादशीनिमित्त महाराष्ट्रातून मोठ्या उत्साहामध्ये अनेक दिंड्या पंढरपूर कडे जात आहेत या धर्तीवर आषाढी एकादशीच्या निमित्ताने आष्टी येथील संस्कृती विद्यामंदिर शाळेच्या विद्यार्थ्यांनी आष्टी शहरामध्ये बाल चिमुकल्यांनी दिंडीचा आनंद घेतला यामध्ये अनेक विद्यार्थ्यांनी पारंपारिक वारकरी संप्रदायाच्या वेशभूषा परिधान करून दिंडीमध्ये सहभाग घेतला होता या संस्कृती विद्यामंदिर शाळेच्या चिमुकल्यांनी दिंडी सोहळ्याने आष्टीकरांचे लक्ष वेधून घेतले.

आष्टी येथील संस्कृती विद्यामंदिर या शाळेची गुरुवार दि.३.जुलै.२०२५ रोजी आषाढी एकादशी निमित्त माऊली मंदिर या ठिकाणी पायी दिंडी सोहळा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.ङ्क या दिंडी सोहळ्यात विद्यार्थी विठ्ठल, रुख्मिणी,संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव,संत चोखामेळा,संत गोरोबा,संत सावता महाराज,संत एकनाथ, संत नरहरी,संत शेख महंम्मद, संत निलोबा, निवृत्तीनाथ, संत सोपान,संत जनाबाई,संत सोयराबाई,संत मुक्ताबाई, संत कान्होपात्रा,वारकरी, भालदार, चोपदार अशा वेगवेगळ्या वेशभूषेत तुळशी,टाळ,चिपळ्या, पताका घेऊन आले होते.

विद्यार्थ्यांनी पारंपारिक पद्धतीने केलेल्या भजन आणि विठ्ठल नामाच्या जयघोषात पूर्ण परिसर भक्तिमय झाला. विद्यार्थ्यांनी रिंगण करत हातात पताका घेऊन टाळ आणि अभंगाच्या तालावर ठेका धरत तसेच फुगडी खेळून भक्तिमय वातावरण निर्माण केले.

या पायी दिंडी सोहळ्याचा विद्यार्थ्यांनी मनमुराद आनंद लुटला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे संचालक अशोक तांबे सर , सौ. शितल तांबे मॅडम , सर्व शिक्षिका , शिक्षक व शिक्षिकेतर कर्मचारी उपस्थित होते

# केस मागे का घेत नाही म्हणून केज तालुक्यात महिलेवर कोयत्याने हल्ला : प्रकृती गंभीर !

केज । प्रतिनिधी

जुन्या भांडणाच्या केस वरून केज तालुक्यात दोन गटात तुंबळ हाणामारी झाली असून महिलेवर तलवार आणि कोयत्याने हल्ला केला. तिच्यावर वार केल्याने भांडणात जखमी महिलेची प्रकृती गंभीर असून तिला अंबाजोगाई येथे उपचार सुरू आहेत.

दि. ३ जुलै रोजी सकाळी केज तालुक्यातील डोका येथे सुनील भारत भांगे हे त्यांची म्हैस घराच्या समोर बांधीत असताना त्यांची मुलगी राजश्री यांना, काहीजण हातात तलवार, कोयता, लोखंडी पाईप आणि दगड घेऊन आपल्या घराकडे येत असल्याचे दिसले. ती असे म्हणताच सुनील भांगे हे घरी गेले असता; विक्रम भागवत भांगे, सागर विक्रम भांगे आणि विशाल विक्रम भांगे हे कोयते व तलवार घेवुन त्यांना म्हणाले की, तुम्ही जुनी दाखल केलेली केस मागे का घेतली नाही? पुन्हा दोन दिवस अगोदर आमचेवर का केस केली? असे म्हणुन सुनीलची पत्नी बबीता भांगे हिला विक्रम भांगे याने तिला तलवारीने घाव घातला. यात बबिता हिच्या दोन्ही खांद्याला गंभीर दुखापत झाली. यामुळे ती खाली पडली. तसेच सागर भांगे याने पण कोयत्याने बबीताच्या डोक्यात घाव घालून ठार मारण्याचा प्रयत्न केला.

त्या नंतर सुनीलचे वडील भरत भागवत भांगे हे धावुन आले असता त्यांच्यावर पण विशाल विक्रम भांगे याने डोक्यात व उजवे हाताचे मनगटावर कोयत्याने घाव घातला. हे पाहून मुलगी राजश्री ही आरडा ओरड करत असताना तीला शारदा सागर भांगे व सुरेखा विक्रम भांगे यांनी लोखंडी पाईपने पायावर आणि हातावर मारहाण केली. तसेच सुनीलचे सासरे मधुकर संभाजी मुंडे यांना विशाल विक्रम भांगे याने कोयत्याने डोक्यात घाव घातला आणि सुनील भांगे यांना लोखंडी पाईपने मारहाण केली. या भांडणात महिलेसह चौघे जखमी झाले आहेत. या भांडणात गंभीर जखमी झालेल्या बबिता भांगे हिच्यासह चौघांवर अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद वैद्यकीय महाविद्यालय व ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू असून महिलेची प्रकृती गंभीर आहे. प्रभारी पोलिस अधिकारी पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक राकेश बनसोडे हे तपास करीत आहेत.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याप्रकरणी तरूणाला अटक

धारूर । प्रतिनिधी

धारूर पोलिस ठाणे हद्दीतील एका गावातील तरूणाने अल्पवयीन मुलीला फूस लावून तिच्यावर अत्याचार केला. पिडीतेने दिलेल्या तक्रारीवरून धारूर पोलिस ठाण्यात त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. दिनेश आसाराम सावंत (वय २१) असे आरोपीचे नाव आहे. त्याला अटक करून गुरूवारी (दि.३) न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्याला पाच दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

धारूर तालुक्यातील एका गावातील अल्पवयीन मुलीला दिनेश सांवत याने प्रेमाच्या जाळ्यात अडकवून तिच्यावर लॉजवर नेऊन अत्याचार केला. तसेच तिचे अश्लिल फोटो काढून ते फोटो तिच्या भावाच्या मोबाईलवर पाठवून तु आमचे लग्न लावून दे नाहीतर मी तुमचे वाटोळे करेन अशी धमकी दिली. त्यानंतर पीडित मुलीने आपल्या कुटुंबियांसह पोलिस ठाण्यात धाव घेत सावंत याच्याविरोधात लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला. याची दखल घेत धारूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक देवीदास वाघमोडे यांनी दिनेश सावंत याला गुरूवारी (दि.३) अटक केली. त्यानंतर त्याला न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्याला सात जुलैपर्यंत पोलिस कोठडी सुनावली.

# रयत शिक्षण संस्थेच्या श्री.गणेश विद्या मंदिर अंमळनेर मध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचे शिक्षण सुरू

पिंपळवंडी । प्रतिनिधी

शिक्षण क्षेत्रात नवतंत्रज्ञानाचा प्रभाव दिवसेंदिवस वाढत आहे. याच पार्श्वभूमीवर, श्री. गणेश विद्यालय, अंमळनेर (भां) या प्रगतशील शाळेमध्ये विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता (-ीं्ळषळलळरश्र खपींशश्रश्रळसशपलश - -ख) या आधुनिक विषयाचे प्रशिक्षण देण्यात यणार असुन विद्यालयात कृत्रिम बुद्धिमत्ता चे शिक्षण देण्यासाठी रयत शिक्षण संस्थेने आधुनिक तंत्रज्ञानाचे व नवीन सिस्टीम सॉफ्टवेअर असलेले नऊ पॅनल बोर्ड नुकतेच विद्यालयास दिलेले आहेत. विद्यालयाचे प्राचार्य बडे आर.बी. सह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी या पॅनलचे व सॉफ्टवेअरचे मोठ्या उत्साहात स्वागत करून विद्यालयात उतरवून घेतले आहेत.

या उपक्रमाचा शुभारंभ याच लवकरच केला जाणार आहे. याचा फायदा पाचवी ते बारावी या वर्गाच्या सर्व विद्यार्थ्यांना होणार आहे. तरी अंमळनेर पंचक्रोशीतील पालकांनी विद्यालयामध्ये आपल्या पाल्याचा पाचवी ते बारावीचा प्रवेश निश्चित करून या उपक्रमाचा फायदा घ्यावा असे आवाहन विद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्याकडून करण्यात येत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता हे भविष्यातील शिक्षणाचे एक महत्त्वाचे अंग असून, या शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये तांत्रिक कौशल्य, समस्यांवर उपाय शोधण्याची क्षमता आणि नवोन्मेषाचा विकास होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

या अभ्यासक्रमामध्ये विद्यार्थ्यांना संगणक प्रणाली, मशीन लर्निंग, डेटा विश्लेषण, रोबोटिक्स, आणि -ख च्या विविध वापरांबाबत मूलभूत प्रशिक्षण दिले जाणार आहे. यासाठी शाळेत योग्य सॉफ्टवेअर, संगणक प्रयोगशाळा व तज्ञ मार्गदर्शकांची व्यवस्था करण्यात आली आहे. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही आधुनिक जगाच्या तांत्रिक क्षेत्रात आपले स्थान निर्माण करता येईल, असा विश्वास शिक्षकांनी व्यक्त केला आहे.

# मी ३ खुनांचा साक्षीदार, महादेव मुंडेंचं कातडं, हाड अन् रक्त कराडसमोर टेबलवर ठेवलेलं; जुन्या साथीदाराचे खळबळजनक दावे



**बीड । प्रतिनिधी**

मस्साजोगचे सरपंच संतोष देमशुख यांच्या हत्या प्रकरणातीली मुख्य आरोपी वाल्मीक कराडच्या जुन्या साथीदाराने खळबळजनक असे खुलासे केले आहेत. वाल्मीक कराडचा जुना सहकारी विजयसिंह बांगर यानं धक्कादायक असे आरोप पत्रकार परिषदेत केले. माझ्यासमोरच वाल्मीक कराडनं तिघांना मारलं असून त्याचा मी साक्षीदार आहे असं विजयसिंह बांगरने म्हटलंय. महादेव मुंडे यांची हत्या केल्यानंतर वाल्मीक कराडच्या टेबलवर मुंडेंचं कातडं, हाड आणि रक्त आणून ठेवलेलं. तर संतोष देशमुख यांच्या हत्येआधी मला एका सरपंचाच्या खुनात अडकवणार अशी धमकीही दिली होती. याबाबतचे सर्व पुरावे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि पोलिसांकडे देणार असल्याचं विजयसिंह बांगरने म्हटलंय.

वाल्मीकसोबत बिनसल्यानंतर विजयसिंह बांगर बाजूला झाले होते. पण त्यानंतरही वाल्मीकने बांगरला सोबत काम करण्यास सांगितलं होतं. पण बांगरने नकार दिल्यानं दोघातले वाद वाढले. आता बांगरने पत्रकार परिषद घेत अनेक खळबळजनक खुलासे केलेत. यात महादेव मुंडे यांच्या हत्येनंतर त्यांची कातडी, हाडं, रक्त कराडच्या टेबलवर ठेवलं होतं असा धक्कादायक दावा बांगरने केलाय.

संतोष देशमुख यांच्या हत्येच्या एक ते दीड वर्षे आधी महादेव मुंडे यांचा निर्घृण खून झाला होता. परळीतल्या तहसीलदार कार्यालयासमोर असणाऱ्या मैदानात ही हत्या झाली होती. हत्येनंतर पोलिसांना रात्री गाडी सापडली पण तिथून ५० मीटर अंतरावर असलेला मृतदेह दिसला नव्हता. दुसऱ्या दिवशी मृतदेह आढळून आळा होता.

**वाल्मिक कराडची महिलेमार्फत धमकी**

बाळा बांगर यांच्या मनगटावर छत्रपती शिवाजी महाराजांचं चित्र गोंदलेलं आहे. आपण छत्रपती शिवाजी महाराज आणि संत भगवानबाबा यांच्या विचारांवर चालत आहोत, त्यामुळे हे चित्र गोंदलेलं आहे असं बांगर यांनी सांगितलं. परंतु वाल्मिक कराडने एका बाईमार्फत हे चित्र काढण्यास सांगितलं. नाहीतर हात तोडून पाटोद्याच्या चौकात लटकवू, अशी धमकी दिल्याचं बांगर यांनी सांगितलं.

# बांगर यांनी आरोपींची नावे सांगितली, त्यांचा जबाब नोंदवून त्यांना फिर्यादी करावे; बांगरांच्या धक्कादायक खुलाशानंतर ज्ञानेश्वरी मुंडेंची संतप्त प्रतिक्रिया

बीड । प्रतिनिधी

परळीतील व्यापारी महादेव मुंडे यांच्या हत्येला दीड वर्षांहून अधिक काळ लोटला तरीही आरोपी मोकाट आहेत. बाळा बांगर यांच्या खुलाशानंतर ज्ञानेश्वरी मुंडे यांनी बीडच्या पोलीस अधीक्षकांना (एसपी) उद्देशून तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली. त्या म्हणाल्या, बांगर यांनी आरोपींची नावे सांगितली, त्यांचा जबाब नोंदवून त्यांना फिर्यादी करावे. त्यांना आरोपी माहिती आहेत.तरीही एसपी साहेब शांत का आहेत? आरोपींची पाठराखण का केली जाते? तत्कालीन पोलीस निरीक्षक रवी सानप यांचीही चौकशी व्हावी आणि त्यांचे सीडीआर तपासावेत. पोलिसांवर कोणाचा दबाव आहे, हे उघड व्हावे. जर न्याय देणे शक्य नसेल, तर ही केस बंद करून टाकावी. प्रशासन या प्रकणाकडे दुर्लक्ष करत आहे.

त्या म्हणाल्या की, या प्रकरणाचा तपास केज येथील पोलीस अधिकाऱ्याकडे सोपवण्यात आला आहे, परंतु ते भेटायलाही आले नाहीत. आम्ही आंदोलन, उपोषण केलं, पण तरीही न्याय मिळाला नाही. बांगर यांनी काल टेबलवर मांस ठेवल्याचा खुलासा केला, तरीही पोलिसांची शांतता का? आरोपींची पाठराखण कोण करत आहे, याचा तपास व्हायला हवा, अशी मागणी त्यांनी केली.

हे पत्रक, मुद्रक व प्रकाशक विलास दिगंबरराव डोळसे यांनी कल्पना अक्षर मुद्रणालय पाटोदा (४१४२०४) जि.बीड येथे छापून सायं. दै. पाटोदा संचार कार्यालय, बसस्टॅण्डसमोर पाटोदा जि. बीड येथे प्रसिध्द केले. (संपादक– विलास डोळसे) मोबा.९४२३४७१८३३ (बीड न्याय कक्षेत)

“Printed by Vilas Digambarrao Dolse, Published byVilas Digambarrao Dolse, on behalf of Vilas Digambarrao Dolse, and Printed at Kalpana Akshar Mudranalaya Patoda (414204), Dist. Beed. and published from Eveing Daily Patoda Sanchar in front of Bus Stand, Patoda Dist. Beed Editor Vilas  Dolse,(Beed Justice)

# संचार

## जाहिर प्रगटन, कोर्टाची जाहिर नोटीस, जन्म-मृत्युची नोंद, निविदा सुचना, ई टेंडर, नावात बदल, वाढदिवस शुभेच्छा जाहिरात तसेच इतर जाहिराती व बातम्या प्रसिध्दीसाठी संपर्क करा

**९४२३४७१८३३**

**७०२०६४२६९३**




## दै. संचार च्या अंकाची पीडीएप आपल्या मोबाईलवर मिळविण्यासाठी ९४२३४७१८३३ या मोबाईल नंबरवर मेसेज करा किंवा क्यूआर कोड स्कॅन करा